# सन १९४८चा मुंबई अधिनियम क्रमांक २२.

## [मुंबई निर्वासित अधिनियम, १९४८.]

[२९ मार्च १९४८.]

ह्या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम यांअन्वयें अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यांत आल्या आहेत :—

सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६६.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

### निर्वासितांची नोंदणी सक्तीची करण्यासाठीं व त्यांना एका जागेहून दुसऱ्या जागीं हलविण्यासाठीं आणि कांहीं इतर कारणांसाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, निर्वासितांना साहाय्य देणें व त्यांचें पुनर्वसन करणें आणि सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता व सुरक्षितता राखणें सुकर व्हावें म्हणून निर्वासितांची नोंदणी करण्यासाठीं आणि त्यांना एका जागेहून दुसऱ्या जागीं हलविण्याचें नियमन करण्यासाठीं तसेंच यांत निर्दिष्ट केलेल्या कांहीं इतर कारणांसाठीं तरतूद करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, या अन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

लघुसंज्ञा व व्याप्ति.

१. (१) ह्या अधिनियमास मुंबई निर्वासित अधिनियम, १९४८ असें म्हणावें.

(२) तो सबंध मुंबई राज्यास लागू आहे.

अर्थविवरण.

२. ह्या अधिनियमांत "निर्वासित" या संज्ञेचा अर्थ, ज्या इसमानें आपलें इतरत्र असलेलें राहण्याचें ठिकाण, तेथील अंतस्थ प्रक्षोभामुळें किंवा अशा प्रक्षोभाच्या भीतीमुळें सोडून मुंबई राज्यांत, तारीख १ माहे ऑगस्ट सन १९४७ पासूनच्या काळांत प्रवेश केला असेल असा कोणताहि इसम असा समजावा.

नोंदणी केंद्रें.

३. बृहन्मुंबईत, बृहन्मुंबई पोलीस कमिशनरनें आणि इतरत्र, जिल्हा फौजदारी न्यायाधिशानें, शक्य तितक्या लवकर, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें,—

(अ) निर्वासितांच्या राहण्याची सोय जींत करण्यांत येत असेल अशी प्रत्येक छावणी, आणि

(ब) त्यानें निर्दिष्ट केलेलें प्रत्येक विशिष्ट क्षेत्र

यांच्या संबंधांत निर्वासितांच्या नोंदणीसाठीं नोंदणी केंद्र स्थापन केलें पाहिजे आणि असें प्रत्येक केंद्र स्वाधीन असणारा नोंदणी प्राधिकारी म्हणून एखाद्या इसमाची किंवा इसमांच्या समितीची नेमणूक केली पाहिजे आणि असें प्रत्येक केंद्र अशा इसमाच्या किंवा अशा समितीच्या स्वाधीन राहील :

परंतु, राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें, वेळोवेळीं, असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, ह्या कलमाअन्वयें असलेलीं पोलीस कमिशनराचीं किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधिशाचीं कामें अशा अधिसूचनेंत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि इतर अधिकाऱ्यानें केलीं पाहिजेत.

निर्वासितांची नोंदणी.

४. (१) मुंबई राज्यांत, त्या त्या वेळीं असलेल्या प्रत्येक निर्वासितानें, हा अधिनियम अंमलांत येण्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आंत, किंवा तो राज्यांत आल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आंत, यापैकीं जी मुदत उशिरांची असेल त्या मुदतींत, ज्या छावणींत त्याची राहण्याची सोय करण्यांत येत असेल त्या छावणीच्या नोंदणी केंद्रांत, किंवा ज्या छावणीसाठीं नोंदणी केंद्र स्थापन करण्यांत आलें असेल त्या छावणीव्यतिरिक्त इतर ठिकाणीं त्याची राहण्याची सोय करण्यांत येत असेल किंवा तो राहत असेल तर, ज्या क्षेत्रांत त्याची राहण्याची सोय करण्यांत येत असेल किंवा तो राहत असेल त्या क्षेत्राच्या नोंदणी केंद्रांत स्वतःची नोंदणी करून घेतली पाहिजे :

परंतु, जो एखाद्या कुटुंबाचा प्रमुख असेल असा निर्वासित त्या त्या वेळीं त्याच्याबरोबर राहत असलेल्या त्याच्या कुटुंबातील इसमांच्या नोंदणीसाठीं जबाबदार असेल :

तसेंच, जेव्हां निर्वासित स्त्री असेल अथवा अवयस्क, वेडा किंवा मूढ असेल अथवा आजारपणामुळें किंवा दौर्बल्यामुळें नोंदणी केंद्रावर हजर होण्यास असमर्थ असेल तेव्हां, अशा निर्वासिताची त्या त्या वेळीं जो इसम काळजी घेत असेल, तो त्या निर्वासित इसमाच्या नोंदणीबद्दल जबाबदार असेल.

(२) पोटकलम (१) अन्वयें नोंदणी करून घेणाऱ्या निर्वासितानें किंवा पोटकलम (१) अन्वयें निर्वासिताच्या नोंदणीस जबाबदार असलेल्या इसमानें, यथाशक्ति पहिल्या अनुसूचींत निर्दिष्ट केलेला नमुना बिनचूकपणें भरला पाहिजे, किंवा भरून घेतला पाहिजे.

नोंदणी प्रमाणपत्र.

५. नोंदणी प्राधिकाऱ्यानें ह्या अधिनियमाअन्वयें नोंदणी करून घेणाऱ्या प्रत्येक निर्वासितास, दुसऱ्या अनुसूचींत दिलेल्या नमुन्याप्रमाणें नोंदणी प्रमाणपत्र दिलें पाहिजे.

पत्त्यांतील बदल.

६. (१) जर एखादा निर्वासित इसम कलम ५ अन्वयें दिलेल्या नोंदणी प्रमाणपत्रांत नमूद केलेला आपला राहण्याच्या जागेचा पत्ता बदलील तर, त्यानें पत्त्यांत असा बदल झाल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आंत आपल्या नवीन जागेचा पत्ता, ज्यानें नोंदणी प्रमाणपत्र दिलें त्या नोंदणी प्राधिकाऱ्यास, आणि अशी नवीन जागा दुसऱ्या नोंदणी प्राधिकाऱ्याच्या अधिकार-क्षेत्रांत असेल तर, अशा दुसऱ्या नोंदणी प्राधिकाऱ्यास कळविला पाहिजे ; आणि त्याच वेळीं, नोंदणी प्रमाणपत्रांत नवीन पत्ता दाखल करतां यावा म्हणून तें दुसऱ्या नोंदणी प्राधिकाऱ्याकडे पाठविलें पाहिजे:

परंतु, जेव्हां निर्वासित इसम हा, कुटुंबप्रमुख नसेल तेव्हां, कुटुंब प्रमुखानें, आणि जेव्हां निर्वासित इसम स्त्री असेल अथवा अवयस्क, वेडा किंवा मूढ असेल अथवा आजारी किंवा दुर्बल इसम असेल तेव्हां, अशा निर्वासिताची त्या त्या वेळीं जो इसम काळजी घेत असेल त्या इसमानें वर सांगितल्याप्रमाणें पत्त्यांतील बदल नोंदणी प्राधिकाऱ्यास कळविला पाहिजे आणि त्याजकडे नोंदणी प्रमाणपत्र पाठविलें पाहिजे.

(२) जेव्हां निर्वासिताच्या नोंदणी प्रमाणपत्रांत नमूद केलेल्या पत्त्यांतील बदल त्याच्या तात्पुरत्या गैरहजेरीमुळें झाला असेल आणि तीन महिन्यापेक्षां अधिक मुदतीपर्यंत अशा रीतीनें गैरहजर राहण्याचा त्याचा इरादा नसेल तेव्हां, पोटकलम (१) मधील कोणताहि उपबंध लागू असणार नाहीं.

विवक्षित छावणींत, जागेंत किंवा क्षेत्रांत राहण्याविषयीं आणि अशा छावणींतून जागेंतून किंवा क्षेत्रांतून निघून जाण्याविषयीं निर्वासितांना आदेश देण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

७. राज्य सरकारास, लेखी आदेशाद्वारें, कोणत्याहि निर्वासितास, किंवा निर्वासितांच्या वर्गास, कोणत्याहि छावणींत, जागेंत किंवा क्षेत्रांत राहण्याविषयीं किंवा आदेशांत निर्दिष्ट केलेल्या मुदतींत कोणतीहि छावणी, जागा किंवा क्षेत्र सोडून जाण्याविषयीं आणि मुंबई राज्यांतील कोणत्याहि इतर छावणींत, जागेंत किंवा क्षेत्रांत राहण्याविषयीं निदेश देण्याचा अधिकार आहे.

८. जर कोणताहि निर्वासित कलम ७ अन्वयें दिलेल्या आदेशानुसार कोणतीहि छावणी, जागा किंवा क्षेत्र सोडून जाण्यांत कसूर करील, तर, त्यास, अशा छावणींतून, जागेंतून किंवा क्षेत्रांतून, राज्य सरकार सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें निर्दिष्ट करील अशा रीतीनें हलविण्याचा कोणत्याहि पोलीस अधिकाऱ्यास किंवा राज्य सरकारनें याबाबत अधिकृत केलेल्या कोणत्याहि इसमास अधिकार आहे. मुंबई राज्यांतील कोणत्याहि छांवणींतून, जागेंतून किंवा क्षेत्रांतून निर्वासितांना हलविण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

कलम १० मध्यें तरतूद केलेल्या ज्या शास्तीस असा निर्वासित पात्र असेल तीस, ह्या कलमांतील कोणत्याहि उपबंधामुळें बाध येणार नाहीं.

९. (१) राज्य सरकारनें याबाबत अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला, लेखी आदेशाद्वारें, कोणत्याहि निर्वासितास, किंवा कलम ४, पोट-कलम (१) अन्वयें निर्वासिताच्या नोंदणीस जबाबदार असलेल्या कोणत्याहि इसमास, अशा आदेशाच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आंत, स्वतःला किंवा ज्याच्या नोंदणीसाठीं तो जबाबदार असेल त्या इसमाला देवी टोंचून घेण्याविषयीं किंवा प्लेग, पटकी (कॉलरा) किंवा विषमज्वर (टायफॉइड) यास प्रतिबंधक अशी लस टोंचून घेण्याविषयीं फर्मावण्याचा अधिकार आहे; मात्र अशा आदेशाच्या तारखेच्या निकटपूर्वी सहा महिन्यांच्या आंत, अशा निर्वासितास आपणाकडून देवी टोंचण्यांत किंवा पुन्हा टोंचण्यांत आल्या आहेत किंवा रोगप्रतिबंधक लस टोंचण्यांत आली आहे असें, नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीनें किंवा याबाबत राज्य सरकारनें योग्य रीतीनें अधिकृत केलेल्या देवी टोंचणाऱ्यानें किंवा लस टोंचणाऱ्यानें दिलेलें प्रमाणपत्र त्यानें हजर केल्यास, अशा आदेशानुसार देवी किंवा रोगप्रतिबंधक लस टोंचण्याची त्यास आवश्यकता असणार नाहीं. निर्वासितांस देवी टोंचण्याबावत किंवा रोग प्रतिबंधक लस टोंचण्याबावत आदेश.

(२) त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि विधिअन्वयें, कोणत्याहि इसमाची स्वतःस किंवा दुसऱ्या कोणत्याहि इसमास देवी टोंचण्याची किंवा रोगप्रतिबंधक लस टोंचण्याची जी कोणतीहि पात्रता असेल तीस, ह्या कलमांतील कोणत्याहि उपबंधामुळें बाध येणार नाहीं.

१०. (१) जो कोणी कलम ४ किंवा ६ अन्वयें आवश्यक असलेल्या गोष्टींचें पालन करण्याचें नाकारील किंवा वैध सबबीवांचून तसें करण्यांत हयगय करील त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा वीस रुपये दंडाची शिक्षा होईल. शास्ती.

(२) जो कोणी इसम कलम ४, पोट-कलम (३) अन्वयें नमुना भरतांना जो खोटा आहे आणि जो खोटा असल्याचें त्यास माहीत आहे, किंवा जो खोटा आहे असें त्यास वाटतें असा तपशील देईल किंवा जो कोणी इसम ह्या अधिनियमाचे किंवा तदन्वयें केलेला कोणताहि नियम याच्या कोणत्याहि इतर उपबंधाचें किंवा ह्या अधिनियमानुसार दिलेल्या कोणत्याहि आदेशाचें उल्लंघन करील त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा पांचशें रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

११. कलम ३ अन्वयें नोंदणी प्राधिकारी म्हणून नेमलेला प्रत्येक इसम किंवा समितीचा प्रत्येक सदस्य, आणि कलम ८ अन्वयें निर्वासितांस हलविण्यास राज्य सरकारनें अधिकृत केलेला प्रत्येक इसम हे भारतीय दंड संहिता, कलम २१च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असें समजलें पाहिजे. नोंदणी प्राधिकारी आणि निर्वासितांना हलविण्यास अधिकृत केलेले इसम लोकसेवक असणें.

हा अधिनियमाअन्वयें केलेल्या कारवाईचें संरक्षण.

१२. ह्या अधिनियमाअन्वयें किंवा तदन्वयें केलेल्या नियमाअन्वयें किंवा दिलेल्या आदेशाअन्वयें सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा जें करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याहि कृत्याबद्दल, कोणत्याहि इसमाविरुद्ध कोणताहि दावा, खटला किंवा इतर वैध कारवाई चालणार नाहीं.

कांहीं अपराध संज्ञेय असणें.

१३. कलम १०, पोट-कलम (१) खालील अपराधांव्यतिरिक्त ह्या अधिनियमाखालील सर्व अपराध संज्ञेय असतील.

कामें सोंपवून देणें.

१४. राज्य सरकारास, राजपत्रांत जाहीर केलेल्या आदेशाद्वारें, असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, ह्या अधिनियमाअन्वयें त्यास देण्यांत आलेला कोणताहि अधिकार किंवा त्याच्याकडे सोंपविण्यांत आलेलें कोणतेंहि कर्तव्य निदेशांत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा परिस्थितींत, व अशा कोणत्याहि शर्तीनुसार, राज्य सरकारच्या मतें कलेक्टराहून कमी दर्जाचा नाहीं असा जो अधिकारी अशा रीतीनें निर्दिष्ट करण्यांत येईल त्याजकडून चालविण्यांत किंवा बजाविण्यांत येईल.

नियम.

१५. (१) राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून व वरील अधिकाराच्या सामान्यतेस बाध येऊं न देतां, अशा नियमांत पुढील गोष्टींबाबत तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(१) कलम ४ अन्वयें नोंदलेल्या निर्वासितांच्या नोंदवह्या तयार करणें व चालू ठेवणें;

(२) ह्या अधिनियमाअन्वयें दिलेले आदेश निर्वासितांवर बजाविण्याची रीत; आणि

(३) कलम ९ अन्वयें निर्वासितांना देवी टोंचणें व रोगप्रतिबंधक लस टोंचणें ;

अधिनियमाच्या कक्षेंतून वगळण्याचा अधिकार.

१६. (१) राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें, असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, कोणत्याहि विशिष्ट क्षेत्रांतील किंवा जागेंतील निर्वासितास किंवा निर्वासितांच्या कोणत्याहि वर्गास, ह्या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याहि उपबंधांच्या कक्षेंतून वगळण्यांत यावें किंवा ह्या अधिनियमाअन्वयें आवश्यक असलेल्या कोणत्याहि गोष्टींची त्यांस माफी देण्यांत यावी.

(२) राज्य सरकारनें याबाबत अधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, लेखी नमूद करावयाच्या कारणांसाठीं असा आदेश देण्याचा अधिकार आहे कीं, कोणत्याहि निर्वासितास ह्या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याहि उपबंधांच्या कक्षेंतून वगळण्यांत यावें किंवा ह्या अधिनियमाअन्वयें आवश्यक असलेल्या कोणत्याहि गोष्टींची त्यास माफी देण्यांत यावी.

# पहिली अनुसूचि.

[कलम ४ (२) पहा.]

**नोंदणीचा नमुना.**

**मुंबई सरकार.**

निर्वासितांची नोंदणी.

(१) अर्जदाराचें संपूर्ण नांव.
(आडनांव प्रथम लिहून मोठ्या अक्षरांत लिहावें).

(२) वय.

(३) पुरुष किंवा स्त्री.

(४) विवाहित किंवा अविवाहित.

(५) मुंबई राज्यांत सध्यां त्याच्यावर अवलंबून असलेल्या इसमांचीं नांवें, त्यांचें नातें, वय आणि पुरुष किंवा स्त्री तें.

(६) जें ठिकाण त्यानें सोडलें त्या ठिकाणीं मागें राहिलेले व त्याच्यावर अवलंबून असलेले इसम असतील तर, त्यांचीं नांवें, त्यांचें नातें, वय आणि पुरुष किंवा स्त्री तें.

(७) स्थानत्याग करण्यापूर्वीचा पत्ता ; गांव, तहशील, जिल्हा (तपशीलवार).

(८) सध्यांचा पत्ता (इमारत, मजला, सडक, रस्ता वगैरे).

(९) अर्जदाराजवळ स्वतःची ओळख पटवून देणारे दस्तऐवज आणि स्थानत्यागासंबंधींचे इतर कागदपत्र असतील तर त्यांचा तपशील.

(१०) जें ठिकाण त्यानें सोडलें त्या ठिकाणीं तो राहिल्याची मुदत.

(११) मुंबई राज्यांत येण्याची तारीख व ठिकाण.

(१२) जें ठिकाण त्यानें सोडलें त्या ठिकाणीं किंवा इतरत्र राहिलेली किंवा गमाविलेली कोणतीहि जंगम किंवा स्थावर मालमत्ता व तिची किंमत.

(१३) स्थानत्याग करण्यापूर्वी कोणतीहि मालमत्ता त्यानें विकली किंवा कसें, जर विकली असेल तर तिचा तपशील आणि ज्या किंमतीस विकली ती किंमत.

(१४) शैक्षणिक व तंत्रविषयक पात्रता.

(१५) स्थानत्याग करण्यापूर्वीचा धंदा, व्यवसाय किंवा व्यापार व मासिक उत्पन्न.

(१६) स्थानत्याग करण्यापूर्वी करीत असलेला धंदा, व्यवसाय किंवा व्यापार याव्यतिरिक्त इतर धंदा, व्यवसाय किंवा व्यापार करण्याकडे असलेला कल.

(१७) मुंबई राज्यांत किंवा भारतांत इतरत्र स्थायिक होण्याकरितां जमीन घेतली असल्यास तिचा तपशील.

(१८) सध्यांचें उपजीविकेचें साधन.

(१९) सध्यां जवळ असलेलीं द्रव्यसाधनें.

(२०) सरकारी अथवा बिनसरकारी रीतीनें सध्यां कांहीं सवलती किंवा मदत मिळत असल्यास त्यांचा तपशील.

(२१) पुनर्वसनासाठीं कोणत्याहि सवलतींची अगर मदतीची आवश्यकता आहे किंवा कसें, तशी आवश्यकता असल्यास त्यांचा तपशील.

(२२) त्याची मुंबई राज्यांत राहण्याची इच्छा आहे किंवा कसें, जर तसें राहण्याची इच्छा असेल तर किती दिवस.

(२३) मुंबई राज्याबाहेर जाण्यास राजी आहे किंवा कसें, तसें असल्यास ज्या ठिकाणीं जाण्याची त्याची इच्छा आहे तें ठिकाण.

शेरा.

अर्जदाराची सही/डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि/किंवा अर्जदाराचें छायाचित्र, असल्यास.

ठिकाण.

तारीख माहे सन १९५ .

नोंदणी प्राधिकारी.

## दुसरी अनुसूचि.

(कलम ५ पहा.)

### नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना.

### मुंबई सरकार.

राजनैतिक व सेवा विभाग.

अनुक्रमांक.

निर्वासित जींत दाखल झाला त्या छावणीचा क्रमांक.

नोंदणी कचेरी क्रमांक.

निर्वासिताचें संपूर्ण नांव.

स्थानत्यागापूर्वीचा पत्ता.

सध्यांचा पत्ता.

कुटुंबप्रमुखाचें नांव.

निर्वासिताची सही किंवा बोटाचा ठसा.

नोंदणी कचेरी.

नोंदणी कोणी केली.

तारीख.

ठिकाण.

तारीख माहे सन १९५ .

नोंदणी प्राधिकारी.

# THE BOMBAY BUILDING (CONTROL ON ERECTION, RE-ERECTION AND CONVERSION) ACT, 1948.

(Bom. XXXI of 1948.)

## मुंबईचा इमारती बांधणें, पुन्हा बांधणें व त्यांचें रूपांतर करणें यांवर नियंत्रण ठेवण्यांबाबत अधिनियम, १९४८.

### अनुक्रमणिका.


प्रस्तावना.

कलमें. पान.

१. लघुसंज्ञा, व्याप्ति व लागू करणें ... ... ... ... १०८१

२. व्याख्या ... ... ... ... ... ... १०८२

३. इमारतींच्या नियंत्रकांची नेमणूक ... ... ... ... १०८२

४. इमारती बांधणें किंवा पुन्हा बांधणें किंवा इमारती बांधण्याचें किंवा पुन्हा बांधण्याचें चालू ठेवणें किंवा त्यांचें रूपांतर करणें याकरितां परवानगीसाठीं अर्ज ... १०८३

५. [ गाळण्यांत आलें ] ... ... ... ... ... १०८३

६. अपील करण्याचा हक्क ... ... ... ... ... १०८३

७. नुकसानभरपाई मागण्यास मनाई ... ... ... ... १०८३

८. इतर अधिनियमांचा बचाव ... ... ... ... .. १०८३

९. शास्ति ... ... ... ... ... ... १०८३

१०. कंपन्या वगैरे यांनीं केलेला अपराध ... ... ... ... १०८४

११. प्रवेश करण्याचा अधिकार वगैरे ... ... ... ... १०८४

१२. ह्या अधिनियमांअन्वयें काम करणाऱ्या इसमांस संरक्षण ... ... ... १०८५

१३. बचाव ... ... ... ... ... ... १०८५

१४. नियम करण्याचा अधिकार ... ... ... ... .. १०८५

१४अ. सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६९ अन्वयें रचना केलेल्या गृहनिर्माण मंडळाकडे नियंत्रकाचे अधिकार सोंपवून देणें ... ... ... ... १०८५

१५. रद्द करणें ... ... ... ... ... ... १०८६

अनुसूचि.

## सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३१.

[मुंबईचा इमारती बांधणें, पुन्हा बांधणें व त्यांचें रूपांतर करणें यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९४८.]

[१० एप्रिल १९४८.]

ह्या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम यांअन्वयें अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यांत आल्या आहेत :—

सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६९.

*सन १९५० चा मुंबई अधिनियम १५.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५३ चा मुंबई अधिनियम ५३.

सन १९५४ चा मुंबई अधिनियम ५८.

### मुंबई प्रांतांत इमारती बांधणें, पुन्हा बांधणें व त्यांचें रूपांतर करणें यांवर नियंत्रण ठेवण्यासाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, अधिक चांगल्या राहण्याच्या जागा उपलब्ध करून देण्याच्या हेतूनें आणि इमारतींची वाढ काटकसरीनें व पद्धतशीर रीतीनें व्हावी तसेंच सार्वजनिक करमणुकीच्या व औद्योगिक उपक्रमाच्या कारणासाठीं बांधावयाच्या किंवा पुन्हा बांधावयाच्या इमारती ह्या गर्दी व उपद्रव टाळण्याकरितां योग्य ठिकाणीं बांधण्यांत याव्यात या हेतूनें मुंबई प्रांतांत इमारती बांधणें, पुन्हा बांधणें आणि त्यांचें रूपांतर करणें यांवर नियंत्रण ठेवण्यासाठीं आणि कांहीं इतर कारणांसाठीं तरतूद करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. (१) ह्या अधिनियमास मुंबईचा इमारती बांधणें, पुन्हा बांधणें व त्यांचें रूपांतर करणें यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९४८ असें म्हणावें. लघुसंज्ञा, व्याप्ति व लागू करणें.

(२) तो अनुसूचींत निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांस लागू आहे.

---

*मुंबईचा इमारती बांधण्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम १५) याचें कलम ६ पुढीलप्रमाणें आहे :—

६. बचाव. उक्त अधिनियमांत ह्या अधिनियमाअन्वयें केलेल्या सुधारणांमुळें पुढील गोष्टींस बाध येणार नाहीं :—

(१) ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वी आधींच संपादन केलेला, प्राप्त झालेला किंवा पत्करलेला कोणताहि हक्क, बंधन किंवा जबाबदारी, अथवा

(२) ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वी केलेल्या कोणत्याहि अपराधाच्या संबंधांत प्राप्त झालेली कोणतीहि शास्ति, जप्ती किंवा शिक्षा, अथवा

(३) कोणताहि असा हक्क, बंधन, जबाबदारी, शास्ति, जप्ती अगर शिक्षा किंवा ह्या अधिनियमाच्या सुरवातीपूर्वी केलेलें किंवा करूं दिलेलें कोणतेंहि कृत्य यासंबंधांत करावयाची किंवा केलेली कोणतीहि वैध कारवाई किंवा उपाययोजना ;

आणि जणूं हा अधिनियम संमत झाला नव्हता असें समजून अशी कोणतीहि वैध कारवाई किंवा उपाययोजना दाखल करतां येईल, चालू ठेवतां येईल किंवा अंमलांत आणतां येईल आणि कोणतीहि अशी शास्ति, जप्ती किंवा शिक्षा करतां येईल.

(३) राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, तो अशा अधिसूचनेंत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि इतर क्षेत्रासहि लागू होईल.

(४) ज्या क्षेत्रास प्रस्तुत अधिनियम त्या त्या वेळीं लागू असेल त्या क्षेत्रांत, मुंबईचा इमारती बांधण्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५० सुरू झाल्याच्या तारखेनंतर प्रस्तुत अधिनियमाचे उपबंध नाटकगृह, चित्रपटगृह किंवा सार्वजनिक करमणुकीची कोणतीहि इतर जागा यासाठीं उपयोग करण्याचें योजिलेल्या इमारतींसच फक्त लागू होतील :

परंतु, मुंबई शहरांत, मुंबई उपनगर जिल्ह्यांत व ठाणें जिल्ह्याच्या ठाणें तालुक्यांत उक्त उपबंध हे उक्त तारखेनंतर औद्योगिक उपक्रमाकरितां उपयोग करण्याचें योजिलेल्या इमारतींस देखील लागू होतील :

तसेंच, राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, ह्या अधिनियमाचे उपबंध अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा क्षेत्रांस, अशा पूर्वोक्त वर्गातील इमारतींस व अशा तारखेपासून लागू होतील.

व्याख्या. २. विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास, ह्या अधिनियमांत—

(१) "इमारत" या संज्ञेचा अर्थ, ज्यांत विटा, सिमेंट, ॲस्बेस्टॉस सिमेंटचे पत्रे, लोखंड, पोलाद किंवा राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें निर्दिष्ट करील असें कोणतेंहि इतर सामान यांचा ज्यांत उपयोग करण्यांत येत असेल असें घर, पडघर, तबेला, छपरी, झोपडी व इतर प्रत्येक बांधकाम, असा समजावा ;

स्पष्टीकरण.—खिळे, दरवाजे, खिडक्या व बंद करण्याचीं साधनें यांसाठीं लोखंड किंवा पोलाद यांचा उपयोग करणें हें ह्या व्याख्येच्या अर्थानुसार लोखंड किंवा पोलादाचा उपयोग करणें होतें असें समजतां कामा नये.

(२) "नियंत्रक" म्हणजे कलम ३ अन्वयें नियंत्रक म्हणून नेमलेला इसम ;

(२-अ) "इमारतींचें रूपांतर करणें" या शद्बप्रयोगाचा अर्थ, ह्या अधिनियम लागू असलेली जी कोणतीहि इमारत, औद्योगिक उपक्रमाच्या कारणाव्यतिरिक्त इतर कोणत्याहि कारणासाठीं बांधण्यांत आलेली होती किंवा पुन्हा बांधण्यांत आली होती किंवा वापरण्यांत आलेली होती किंवा वापरण्यासाठीं योजिलेली होती अशी इमारत औद्योगिक उपक्रमाच्या कारणासाठीं वापरणें किंवा वापरण्याची परवानगी देणें असा समजावा ; आणि "रूपांतर करणें" या शद्बप्रयोगाचा अर्थ त्याप्रमाणें लावण्यांत आला पाहिजे :

परंतु, एखादी इमारत गुदाम, कोठार किंवा वखार म्हणून वापरण्यांत येत होती याच केवळ कारणावरून ती औद्योगिक उपक्रमाच्या कारणासाठीं वापरण्यांत आली होती किंवा वापरण्याची परवानगी देण्यांत आली होती असें समजतां कामा नये ; परंतु अशी इमारत कोणत्याहि इतर औद्योगिक उपक्रमाच्या कारणासाठीं वापरण्यांत आल्यामुळें झालेला कोणताहि बदल हा अशा इमारतीचें रूपांतर आहे असें समजण्यांत आलें पाहिजे.

(३) "इमारत बांधणें किंवा पुन्हा बांधणें" या शद्बप्रयोगांत कोणत्याहि इमारतींत कोणताहि फेरबदल करणें, तिचा विस्तार करणें किंवा तिच्यांत वाढ करणें यांचा समावेश होतो ; आणि "इमारत बांधणें किंवा पुन्हा बांधणें" या शद्बप्रयोगाचा अर्थ त्याप्रमाणें लावण्यांत आला पाहिजे.

(४) "विहित" म्हणजे ह्या अधिनियमाअन्वयें केलेल्या नियमांनीं विहित केलेलें.

इमारतींच्या नियंत्रकांची नेमणूक. ३. राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरितां कोणत्याहि क्षेत्रासाठीं इमारतींचे नियंत्रक म्हणून एक किंवा अधिक इसम नेमण्याचा अधिकार आहे.

इमारती बांधणें किंवा पुन्हा बांधणें किंवा इमारती बांधण्याचें किंवा पुन्हा बांधण्याचें चालू ठेवणें किंवा त्यांचें रूपांतर करणें याकरितां परवानगी-साठीं अर्ज.

४. (१) इमारत बांधण्याचें किंवा पुन्हा बांधण्याचें काम सुरू करण्याची ज्याची इच्छा असेल किंवा हा अधिनियम ज्या तारखेस अंमलांत आला त्या तारखेपूर्वी सुरू केलेलें इमारत बांधण्याचें किंवा पुन्हा बांधण्याचें काम चालू ठेवण्याची ज्याची इच्छा असेल अशा प्रत्येक इसमानें तसेंच इमारतीचें रूपांतर करण्याची ज्याची इच्छा असेल अशा प्रत्येक इसमानें तसें करण्याकरितां परवानगी मिळण्यासाठीं नियंत्रकाकडे लेखी अर्ज केला पाहिजे. असा अर्ज विहित करण्यांत येईल अशा नमुन्याप्रमाणें असला पाहिजे आणि असा अर्ज ज्या इमारतीच्या बाबतींत केला असेल त्या इमारतीसंबंधीं विहित करण्यांत येईल अशी माहिती त्यांत असली पाहिजे.

(२) असा अर्ज मिळाल्यावर, नियंत्रक त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, राज्य सरकार याबाबत देईल अशा सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, लेखी आदेशाद्वारें—

(अ) अशा आदेशांत निर्दिष्ट करण्यांत येतील अशा कोणत्याहि शर्तीस अधीन ठेवून परवानगी देईल, अथवा

(ब) अशी परवानगी देण्याचें नाकारील.

(३) नियंत्रकास पोट-कलम (१) अन्वयें केलेला अर्ज मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या मुदतीच्या अखेरीस जर नियंत्रकानें कोणताहि लेखी आदेश दिला नाहीं तर, अशी परवानगी कोणतीहि शर्त न घालतां देण्यांत आली आहे असें समजलें पाहिजे.

५. [राज्य सरकारनें परवानगी रद्द करणें किंवा तींत फेरफार करणें.] सन १९५३चा मुंबई अधिनियम ५३, कलम ७ अन्वयें गाळण्यांत आलें.

अपील करण्याचा हक्क.

६. (१) कलम ४, पोट-कलम (२) अन्वयें नियंत्रकानें दिलेल्या आदेशामुळें आपल्यावर अन्याय झाला आहे असें समजणाऱ्या कोणत्याहि इसमास, असा आदेश त्यास कळविल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आंत, राज्य सरकारकडे अपील करण्याचा अधिकार आहे.

(२) अशा अपिलावर राज्य सरकारनें दिलेला आदेश अखेरचा असेल.

नुकसान-भरपाई मागण्यास मनाई.

७. (अ) कलम ४, पोट-कलम (२) अन्वयें नियंत्रकानें दिलेल्या कोणत्याहि आदेशामुळें, अथवा

(ब) कलम ६ अन्वयें राज्य सरकारनें दिलेल्या कोणत्याहि आदेशामुळें, अथवा

(क) ह्या अधिनियमाअन्वयें सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा जें करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याहि कृत्यामुळें

कोणत्याहि इसमाची जी कोणतीहि हानी किंवा नुकसान झालें असेल त्याबद्दल त्यास नुकसान-भरपाई मागतां येणार नाहीं.

इतर अधिनियमांचा बचाव.

८. त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि इतर अधिनियमाअन्वयें इमारत बांधणें किंवा पुन्हा बांधणें किंवा तिचें रूपांतर करणें यांवर निर्बंध घालण्याबाबत कोणत्याहि प्राधिकाऱ्याचा जो अधिकार असेल त्यास ह्या अधिनियमांतील कोणत्याहि उपबंधांमुळें बाध येणार नाहीं.

शास्ति.

९. (१) कलम ४ अन्वयें नियंत्रकानें दिलेल्या परवानगीवांचून किंवा कलम ४ अगर ६ अन्वयें दिलेल्या आदेशाअन्वयें घातलेल्या कोणत्याहि शर्तीचें उल्लंघन करून इमारत बांधण्याचें, पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें कोणतेंहि काम सुरू करतां कामा नये, चालू ठेवतां कामा नये किंवा पार पाडतां कामा नये.

(२) जेव्हां पोट-कलम (१) चें उल्लंघन करून इमारत बांधण्याचें, पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें कोणतेंहि काम सुरू करण्यांत, चालू ठेवण्यांत किंवा पार पाडण्यांत आलें असेल तेव्हां, ज्याच्या खर्चानें इमारत बांधण्याचें, पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें

असें काम सुरू करण्यांत, चालू ठेवण्यांत, किंवा पार पाडण्यांत आलें असेल तो इसम, तसेंच असें काम सुरू करण्याचें, चालू ठेवण्याचें किंवा पार पाडण्याचें ज्यानें अंगीकृत केलें असेल असा कोणताहि इतर इसम आणि असें काम सुरू करण्याच्या, चालू ठेवण्याच्या किंवा पार पाडण्याच्या कामीं सल्लागार किंवा पर्यवेक्षक या नात्यानें कामावर नेमलेला शिल्पकार (आर्किटेक्ट) वास्तुविद्या-विशारद (इंजिनियर) किंवा इतर इसम ह्यांस दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) पोट-कलम (२) खालील अपराधाचा इन्साफ करणाऱ्या कोणत्याहि न्यायालयास कोणतेंहि सामान इमारत बांधण्याच्या किंवा पुन्हा बांधण्याच्या कामासाठीं जमविलें, खरेदी केलें किंवा अन्यथा मिळविलें होते अशी त्याची खात्री झाल्यास, तें सर्व सरकारजमा करण्याविषयीं आदेश देण्याचा अधिकार आहे.

कंपन्या वगैरे यांनीं केलेला अपराध.

१०. जेव्हां ह्या अधिनियमाखालील अपराध करणारा इसम हा, एखादी कंपनी किंवा इतर एकव्यक्तिभूत संस्था किंवा इसमांची मिळून झालेली मंडळी (मग ती संस्थापित असो किंवा नसो) असेल तेव्हां, असा अपराध घडल्याच्या वेळीं तिचा संचालक, व्यवस्थापक, चिटणीस, अभिकर्ता असलेला प्रत्येक इसम किंवा तिच्या व्यवस्थेशीं संबंध असलेला इतर अधिकारी किंवा इसम हा, असा अपराध आपल्या न कळत किंवा संमतीवांचून घडला असें सिद्ध न करील तर, तो अशा अपराधाबद्दल तरतूद केलेल्या शिक्षेस पात्र होईल.

प्रवेश करण्याचा अधिकार वगैरे.

११. (१) राजपत्रित अधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेला जो कोणताहि इसम राज्य सरकारकडून सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें याबाबत अधिकृत करण्यांत आला असेल त्यास पुढील गोष्टीं करण्याचा अधिकार आहे:—

(अ) ज्या जमिनीवर इमारत बांधण्याचें किंवा पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें काम ह्या अधिनियमाच्या उपबंधांचें उल्लंघन करून सुरू करण्यांत, चालू ठेवण्यांत किंवा पार पाडण्यांत येत आहे त्या जमिनीवर प्रवेश करणें व तिची तपासणी करणें;

(ब) ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरितां त्यास आवश्यक वाटतील असे प्रश्न कोणत्याहि इसमास विचारणें;

(क) ज्याच्या खर्चानें इमारत बांधण्याचें, किंवा पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें काम सुरू करण्यांत, चालू ठेवण्यांत किंवा पार पाडण्यांत आलें असेल अशा कोणत्याहि इसमास किंवा असें काम पार पाडण्यासाठीं कामावर लावलेल्या कोणत्याहि इसमास अशा कामासंबंधीं त्याच्या कबजांत असलेलीं पुस्तकें किंवा दस्तऐवज किंवा त्यास असलेली इतर सर्व माहिती हजर करण्याविषयीं किंवा सादर करण्याविषयीं फर्माविणें;

(ड) जें कोणतेंहि सामान ह्या अधिनियमाच्या उपबंधांचें उल्लंघन करून इमारत बांधण्याच्या, पुन्हा बांधण्याच्या किंवा तिचें रूपांतर करण्याच्या कामासाठीं जमविलें, खरेदी केलें किंवा अन्यथा मिळविलें आहे असें त्यास सकारण वाटत असेल तें धरणें आणि कलम ९, पोट-कलम (३) च्या उपबंधांस अधीन राहून विहित केलेल्या रीतीनें त्याची विल्हेवाट लावणें.

(२) जो कोणी पोट-कलम (१) अन्वयें अधिकृत केलेल्या इसमास त्या पोट-कलमाअन्वयें दिलेले कोणतेहि अधिकार चालवितांना हेतुपुरस्सर अडथळा करील किंवा त्यास विचारलेल्या कोणत्याहि प्रश्नाचें उत्तर देण्याचें नाकारील किंवा बुद्धया खोटें उत्तर देईल किंवा उक्त पोट-कलमाअन्वयें मागितलेलीं कोणतींहि पुस्तकें, दस्तऐवज व इतर माहिती हजर करण्याचें किंवा सादर करण्याचें नाकारील त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा पांचशें रुपये दंडाची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**१२.** ह्या अधिनियमाअन्वयें सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा जें करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याहि कृत्याबद्दल कोणत्याहि इसमाविरुद्ध कोणताहि दावा, खटला किंवा इतर वैध कारवाई चालणार नाहीं.

ह्या अधिनियमाअन्वयें काम करणाऱ्या इसमांस संरक्षण.

**१३.** ह्या अधिनियमांतील कोणताहि उपबंध पुढील गोष्टींस लागू असणार नाहीं—

बचाव.

(अ) इमारतीच्या विद्यमान पायाचें किंवा छताचें क्षेत्रफळ किंवा तिची एकूण उंची यांत वाढ न होतां व तिचें रूपांतर न होतां झालेले फेरबदल ;

(ब) सबंध इमारत किंवा इमारतीला मजले असल्यास सबंध मजला पुन्हा बांधला न जातां व तिचें रूपांतर न होतां इमारतीचा मोडकळीस आलेला भाग पुन्हा बांधणें ;

(क) भट्ट्या, चुलीच्या जागा, धूम्रमार्ग, धुराडीं, धुण्याच्या जागा, जलनिस्सारण मार्ग, संडास, मुत्र्या, मलकुंड किंवा मलछिद्र आणि गटारें तपासण्यासाठीं निरीक्षण कोठ्या (इन्स्पेक्शन चेंबर) ;

(ड) पाणी सांठविण्याच्या टाक्या किंवा विहिरी ;

(ई) हद्दीच्या भिंती, आवाराच्या भिंती व कुंपणें ;

(फ) (१) जें सरकारच्या किंवा स्थानिक प्राधिकाऱ्याच्या वतीनें किंवा सरकारशीं किंवा स्थानिक प्राधिकाऱ्याशीं केलेल्या करारानुसार अंगीकृत केलें असेल किंवा पार पाडण्यांत आलें असेल असें इमारत बांधण्याचें, पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें काम, अथवा

(२) ज्याचा खर्च किंवा खर्चाचा कोणताहि भाग सरकारनें किंवा स्थानिक प्राधिकाऱ्यानें देण्याचें कबूल केलें असेल असें इमारत बांधण्याचें, पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें काम.

**१४.** (१) राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें, ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे.

नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषेंकरून व वरील अधिकाराच्या सामान्यतेस बाध येऊं न देतां, अशा नियमांत पुढील गोष्टींबाबत तरतूद करतां येईल :—

(१) कलम ४, पोट-कलम (१) अन्वयें करावयाच्या अर्जाचा नमुना व द्यावयाची माहिती;

(२) कलम ११, पोट-कलम (१) अन्वयें अधिकृत केलेल्या इसमांनीं ज्या रीतीनें आपले अधिकार चालविले पाहिजेत व उक्त पोट-कलमाची कंडिका (ड) अन्वयें धरलेल्या सामानाची ज्या रीतीनें विल्हेवाट लावली पाहिजे ती रीत.

**१४-अ.** ह्या अधिनियमांत कांहींहि असलें तरी, राज्य सरकारास असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, ह्या अधिनियमाअन्वयें नियंत्रकास दिलेले अधिकार व त्याजकडे सोंपविलेलीं कर्तव्यें हीं, ज्या क्षेत्रांत मुंबई गृहनिर्माण मंडळ अधिनियम, १९४८ अंमलांत आला असेल त्या क्षेत्रांत उक्त अधिनियमाअन्वयें रचना केलेल्या गृहनिर्माण मंडळाकडून चालविण्यांत व बजाविण्यांत येतील.

सन १९४८चा मुंबई अधिनियम ६९ अन्वयें रचना केलेल्या गृहनिर्माण मंडळाकडे नियंत्रकाचे अधिकार सोंपवून देणें.

रद्द करणें.

१५. (१) मुंबईचा इमारत बांधण्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत अध्यादेश, १९४८ हा याअन्वयें रद्द करण्यांत आला आहे; आणि याअन्वयें असें जाहीर करण्यांत येतें कीं, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४, कलमें ७ व २५ यांचे उपबंध उक्त अध्यादेश रद्द झाल्याच्या बाबतींत जणूं उक्त अध्यादेश हा अधिनियम होता असें समजून लागू होतील.

(२) उक्त अध्यादेश रद्द करण्यांत आला असला तरीहि, प्रस्तुत अधिनियम सुरू होण्यापूर्वी उक्त अध्यादेशाचें कलम ४, पोट-कलम (१) अन्वयें केलेला कोणताहि अर्ज प्रस्तुत अधिनियमाच्या तत्सम उपबंधांअन्वयें करण्यांत आला होता असें समजलें पाहिजे:

परंतु, प्रस्तुत अधिनियमाचें कलम ४, पोट-कलम (३) मध्यें सांगितलेली एक महिन्याची मुदत ही, असा अर्ज नियंत्रकास ज्या तारखेस मिळाला त्या तारखेपासून सुरू होते असें समजलें पाहिजे.

## अनुसूचि.

१. मुंबई शहर.

२. मुंबई उपनगर जिल्हा.

३. ठाणें जिल्ह्याचा ठाणें तालुका.